RAJA-SHIVÁJI

AN EPIC IN MARÁTHI

IN TWELVE BOOKS

COMPOSED AND PUBLISHED

BY

MAHÁDEVA MORESHVAR KUNTE B. A.

HEAD-MASTER OF THE KOLAPOOR HIGH SCHOOL.

BOOKS IV—VI.

प्रसादवत् प्रसिद्धार्थमिन्दोरिन्दीवरद्युति ॥
लक्ष्म लक्ष्मीं तनोतीति प्रतीतिसुभगं वचः ॥ ४५ ॥

काव्यादर्शः प्रथमः परिच्छेदः

Registered under Act XXV of 18

BOMBAY.

PRINTED AT GANPAT KRISHNAJI'S

BY NARO KRISHNA DUMÁLE BY ORDER OF THE EXECUTORS.

1871.

PREFACE.

My poems are extensively read, for a large number of copies is sold. My poetry belongs to a particular class, and has its peculiar merits and defects. I am conscious of what I am about. I have received encouragement from all places in Maháráshtra, and there are representatives of the school of poetry I belong to in Kolapore, Kurhad, Sattara, Poona, Bombay, and Dhoolia. Encouraged by the common people who instinctively admire the true, the just, and the beautiful without any learning, and by some of the rising generation, whose taste is really influenced by western culture, I have published the second volume of my epic on Shiváji. One half of the epic, impartial readers! is now before you. I have my opponents. To them I have only to say "wait, think, compare, and then weigh evidence. Kindly do not be hasty. An author does not seek to please you only. He seeks to paint an ideal, true, beautiful, and just at all times and in all places. Hence a poet is judged by the present generation as well as by posterity."

In publishing this volume Mr. Vishnu Daji Gadre has rendered me much aid, for which I am specially indebted to him.

Kolapoor
May 1871.

MAHÁDEVA M. KUNTE.

शुद्धिपत्र.

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
३	१९	पिलाजी	निलाजी
४	७	युक्तीची	युक्तिची
५	२	पिलाजी	निलाजी
८	१५	हे शूर	अरे शूर
८	१८	म्लेच	म्लेंछ
१५	४	अस	असें
१६	७	दक्षण	दक्षिण
१९	२	लाकीं	लोकीं
२२	९	म्लेछ्यां	म्लेंच्छा
२२	१४	गणतील	गिळतील
२७	६	कुघोंडी	कुरघोडी
२८	१८	अगण	अंगण
३४	३	वीचारशील	विचारशील
३४	१९	भीतीगे	भ्रांतिगे
३५	१४	शिखा	शिस्वा
३६	५	संभोंती	सभौंती
३६	२०	फुलली.	फुलली
३७	१२	सोंडद	सोंदड

४०	१०	ये	
४९	५	खुल	खुले
६०	२४	तं	तूं
६३	१	सुक्ष्म	सूक्ष्म
८५	१	जा	जो
८६	४	आर्या	आयां
९४	२	थांवतां,	थांबतां,
९६	८	तस	तसा
९८	२२	हटवून;	हटवून
१०६	९	चाऊं	जाऊं
१०८	२३	नघाला	निघाला
११९	१९	रधाव	रे धाव
१२४	२२	किरिणें	किरणें
१२६	२३	झाड्यांत	झाडांत

राजा शिवाजी

भाग १.

मिळाले मराठे. मिळाली सभा ती.
पडे चांदणें, तेज फांके सभोंती.
कडा पाझळे. फार शोभे पन्हाळा.
उठे शूर लोकीं जयाचा उमाळा. १
निघे वाट खालीं. खुली राजदिंडी.
तळीं रानमाजे. उभी किर्र झाडी.
उडे स्वच्छ पाणी, झऱ्यांतून तें ये.
मराठे उभे, हौस पोटीं न माये. २
दडे राजदिंडी, पुढें तो बुरूज.
वरी तोफ मोठी. मराठी रिवाज.
तटाचीं निघालीं सभोंवार टोंकें.
मधें आड झाले महावीर बांके. ३
इथें दाट झाडी. इथें दाट जाळ्या.
सभामंडपा ह्या जणों ह्याच जाळ्या.
खुले उंच जागा, जशी चंद्र शाला.
स्वतां चंद्र जेथें, कशाला मशाला !

जागा तिथें उंच समोर होती.
फांद्या जणों मेहरपी सभोंती.
जाळी मधें त्या झुरुके मजेचे.
राघू जिथें कीं बसलेत साचे. ५
त्या चंद्रतेजें रमणीय रान.
झाडें जणों तीं रचतीं कमान.
पानांत ह्या झाक फुटे विचित्र.
शोभा स्वतां ती बनलीच चित्र. ६
ते गुंफले सुंदर वृक्ष ताजे.
जेथें खरी वेलबुटी विराजे.
ओळंबती हे झुबके कळ्यांचे.
डौलांत कीं सुंदर तेज नाचे. ७
मधुर वास सुटे मृदु हा तिथें,
अनुभवीत सख्या बसल्या जिथें.
अति मनोहर त्या दिसल्या स्त्रिया,
सकळ उत्सुक रंग पहावया. ८
जो वृक्ष पूर्वीं नव्हता जगांत;
ते देव आख्या बसलेत गात;
ज्याचीं फुलें कोमल, लाल देट;
खालीं स्वतां तीं पडतात दाट. ९
जाळी पुढें अंगण स्वच्छ साचें.
तेथें किती सोज्वळ पुष्प सांचे!
हें चांदणें शुभ्र; सडा फुलांचा.
आहे जणों नंदनबाग साचा. १०

फुलांतून चाले मजेचा सुवास.
सुटे मंद वारा हि; झाली अरास.

इथें मुख्य जागीं बसे तो शिवाजी.
नसे डौल कांहीं, मनीं शांत, राजी. ११
सभोंवार झाले मराठे उभे ते.
ह्मणे राय " बोला मनीं काय येतें.
सुचे युक्ति जी जी पुढें सर्व आणा.
जरी ' या लढा ' हा मराठाच बाणा; १२
तरी युक्ति योजा. करा हो ! विचार.
पुढें पाहतां पाय टाकी हुशार. "

मनीं त्वेष ज्याच्या; भरे शौर्य अंगीं;
सदा दंग युद्धांत जो वीर जंगी; १३
उभा तो पिलाजी उतावीळ भारी,
ह्मणे. " जिंकिली फौज केव्हांच सारी.
करूं एक गर्दी, चला शत्रु मारूं.
दुजी युक्ति नाहीं; रणीं त्रास सारूं. " १४

असें बोलतां, थोर हर्हर उडाला.
निघे सर्व तर्वारू. हा पूर आला.
तसा तो पिलाजी ह्मणे, " स्वस्थ राहा.
अशी व्यर्थ गर्दी कशाला ? अहाहा ! १५

उतावीळ कामा नये हो ! कधीं ही.
जिथें युक्ति आहे, तिथें त्रास नाहीं.
किती अल्प तो युक्तिकर्ता असेना.
जयें कीर्ति पावेल त्याचीच सेना. १६
कुठें अल्प अंकूश ! हत्ती कुठें तो !
तरी जेर हत्तीच तात्काल येतो.
पहा ! युक्तीची योजना काय चाले !
असें चित्त सांगे तसी जीभ बोले. १७
तें चित्त चाळो कळसूत्र जेव्हां;
हा देह नाचे वळणांत तेव्हां.
हें चित्त कीं चंचळवृत्ति झालें,
हा देह तेव्हां विपरीत चाले. १८
अशी चालवी युक्ति साऱ्या जगाला.
सुटे ना कधीं युक्ति देवादिकांला.
रची सेतु तो राम युक्तिप्रयोगें.
मिळे द्रौपदी अर्जुना कोण योगें ? १९
रणीं त्रास होतो. दिसे आज रंग.
तरी युक्ति सांगा. भयाचा प्रसंग.
मुसल्मान वैरी, सर्व थोर सेना.
मराठे जरी शूर, संकेत नाना. ” २०

पुढें पंत बाजी सरे बोलण्याला.
नको बोलणें व्यर्थ केव्हांहि ज्याला.
कसें वागण्याचें ? कसा हा प्रसंग ?

कसी युक्ति लागू पडे ! शांत दंग. २१
ह्मणे " रे पिलाजी ! तुझे बोल गोड.
खुबीदार शैली, तरी भ्रांति सोड.
अरे ! युक्ति योजूं, तरीं युक्ति बोल.
अर्धी चाळणी धान्य गाळी न फोल. २२
गड्यारे! मला युक्ति कांहीं दिसेना.
मुसल्मान वैरी, सवें थोर सेना.
किती कोंडमारा इथें आमचा हा!
पन्हाळ्यास वेढा; खचे धैर्य पाहा. २३
रे ! म्लेंछ योद्धे रणशूर आले.
युद्धीं मराठे थकलेत भाले.
रंजीस आलों. टिकणार कां ! हा !
झाले मराठे दिलगीर पाहा. २४
शरणसें दिसणें रुचतें मला.
जलद काल मुखी मग धांवला.
सकळ एक विचार करूं तरी.
लगट, जूट, रणांत करूं खरी." २५
ह्मणाले अबा. " युक्ति खासी निघाली.
मराठाचि खालीं पहा मान घाली.
मुसल्मान लोकां पुढें नम्र होतां.
खरी कीर्ति गेली. असें दैव आतां. २६
मुसल्मान लोकां नवा जोर यावा.
मराठ्यांतला जोर सारा खचावा.
मुसल्मान लोकीं चढावोढ पाही;

कुणी मारले हे मराठे किती ही. २७
जसे नग्न होऊं, जसे धैर्य सोडूं;
तसा मार खाऊं, तसी मान तोडूं
स्वतांची स्वहस्तें. अशी वेळ आली.
अहा ! युक्ति ऐसी तरी ही निघाली. २८
जिथें कीर्ति जाती, असें खास वाटे.
नको युक्ति . जाणें नको ह्याड वाटे.
बरा त्रास हा रे। बरा मृत्यु हा रे।
नको नग्न होणें. मरूं आज सारे. २९
तरी अन्न नाहीं, मिळेनाच पोटा.
कसा सोसवे हा भुकेचा झपाटा ?
पन्हाळ्यास वेढा, न चाले उपाय.
मिळे अन्न कैसें! करूं आज काय ? ३०
थके सैन्य सारें. नसे धीर कांहीं.
नसे जोर अंगीं, मनीं शांति नाहीं.
पहा ! हात कांपे, करें शस्त्र घ्यावें ?
रणीं काय जावें ? कसं युद्ध व्हावें ? ३१
पहा ! ठाउक्या सर्व ह्या चोर वाटा.
पळूं आज जाऊं, हणूं या झपाटा.
असें चित्त सांगे. तरी मार्ग खोटा.
मराठा पळे. शत्रु मारील रट्टा. ३२
असा माण जातो. अशी कीर्ति जाती.
असी युक्ति अंगीं तरी खास येती.
सुचेना जरी युक्ति कैसी करावी.

नको नम्र होणें. दुजी युक्ति हावी." ३३

जवळ पंडित थोर सदा असे.
सकळ शास्त्र कळा कळवीतसे.
मन जणों, जल सोज्ज्वल निर्मल.
सरल, शांत, सयुक्तिक, कोमल. ३४
मनीं फार घोळी, कशी युक्ति चाले.
मराठ्यांतलें धैर्य कैसें विझालें.
कसे म्लेंच्छ गांठीत गांठीत आले.
कसें आपलें दैव पंगू निघालें. ३५
सुचेना पुढें युक्ति कांहीं कराया.
ह्मणे " जन्म हा व्यर्थ. हे सुज्ञ राया !
जिथें राज्य नाहीं; जिथें कीर्ति नाहीं;
जिथें सौख्य नाहीं; तिथें शांति कांहीं !
ही सृष्टि कैसी ? गुण तीन मोठे,
जे फोडती सर्व जगास फाटे.
तो सत्व लागे. परमार्थ साधे.
माया जळे. मुक्ति मनांत रांधे. ३७
तो सत्व, हें सत्त्वचि भेद नाहीं.
तें सत्व, हें धैर्य. विचार पाहीं.
जो राज्य साधी, बलसत्व दावी.
त्याला खरी मुक्ति मिळे, ह्मणावी. ३८
तो साधु साधी, अति थोर मुक्ति,
जो योजितो स्वाचरणांत युक्ति.

जो शुद्ध; जो निस्पृह, जो तसे
रे ! सौख्यडोहीं; भजनांत रंगे; ३९
जो चालतां षड्रिपुंना न मानी;
जो लोभ जाळीं; न कधीं जुमानी
ह्या सर्व राजादि महा जनाला;
जो आवरी शूर सदा मनाला. ४०
असें युद्ध चाले मनीं अंतरंगीं.
कधीं जोर दावी पहा ! काम जंगी.
पुढें मोड होतां, हटे सुज्ञ सन्त.
जयें काम डोले. न लागेच अंत. ४१
विश्वामित्रें काढला काल कैसा !
खावा वारा, देह नाहींच जैसा.
बांधी आशा; तीर लावी मदाला.
आली जेव्हां मेनका, नाश झाला. ४२
हे थोर राया ! महाशूर योद्ध्या !
तुझें राज्य शोभे, जणों कीं अयोद्ध्या.
जगीं बाह्यरंगीं तुझें युद्ध चाले.
सहा शत्रु ते म्लेंच रूपीच आले. ४३
जरी जोर झाला; जरीं त्रास केला;
तरी धीर द्यावा सदाहि मनाला.
वनीं साधु जातो तपं साधण्याला.
तिथें सिद्ध होतो हणाया सहाला. ४४
नको हा पम्हाळा तसा, सुज्ञ राया !
तयारी करा रांगण्याला निघाया.

नव्हे मोड हा रे ! नव्हे भीति हे ! छी.
नसे लाज. जातां नसे दोष कांहीं. ४५
तरी शेवटीं सांगतों मी पहा ! हें.
पन्हाळा अधीं सोडतां शौर्य आहे.
रणीं बेतली; शत्रुला जोर आला;
खरा शूर रे ! युक्तिला सिद्ध झाला. ४६
भित्रेपणा हा म्हणतील लोक.
व्हावें रणीं युद्ध, तुझाहि शोक.
हें युद्ध होण्यांत घडेल नाश.
आहे वृथा लौकिक भीति पाश. ४७

असे बोल हे ऐकतां लाल झाला.
स्फुरे दंड त्याचा. मनीं राग आला.
मिशा सारल्या. ऊर बाहेर काढी.
दिसे उग्र. कल्लयांस कावून ओढी. ४८
उच्छ्वास मोठा रगडून टाकी.
डोळे जणों ज्वाल, चिढून फांकी,
हातांत सोटा हलवीत राहे.
हातें दुज्या मूठ वळून पाहे. ४९
न्याळी जसा भीम जयद्रथाला;
खाऊं; गिळूं; कीं चिरडूं रथाला;
दाबूं गळा; कीं उडवूं अभाळा;
तैसा पिलाजी चिरडीस गेला. ५०
मनीं आग लागे; तसा ओठ चावी;

पुढें पाय ठेवी; जनीं राग दावी;
जसा अग्नि पेटे, उठे लोळ रानीं,
तसा बोलला हा पिलाजी इमानी. ५१
म्हणे, " रे ! भले ! युक्ति काढावयाला
निघाला. जळो युक्ति, जावो लयाला.
तुम्ही कोण आहां ? नसे ठाउकें कां ?
मराठे. मराठे ! अरे ! भीति टाका. ५२
अरे ! मित्र हो ! शूर देशाभिमानी.
दशा ही अशी आपली कोण मानी ?
जिथें पाय टाकूं, टिके शत्रु तेथें ?
पडे भूल कैसी मराठ्यांस एथें ? ५३
होते कसे पूर्वज ? कोण आहां ?
ते शूर. तुम्ही पळतां. अहाहा !
ते दंग युद्धीं. घरकाम तुम्हां.
त्यांना रुचे शौर्यचि. भीति आम्हां.
मराठे महा राठ झाले मऊ. रे !
रणीं ह्या लढाया न कीं शौर्य ऊरे.
पहा पूर्वजांची महा कीर्ति. वीर !
मराठा अरे ! मारुती. काय शूर ! ५५
युद्धीं सदा तो बलभीम रंगे.
कौशल्य दावी बहु रामसंगें.
चापल्य देहीं खचलें असे कीं.
तो वायुचा हें म्हणतात लोकीं. ५६
तरी वायु आहे मुळीं हा मराठा.

म्हणा कां ! पहा ! सागलों. शूर मोठा,
सदा वेग ज्याला, सदा त्वेष ज्याला,
करी युद्ध जो, सर्व दावी जगाला. ५७
आला असे शत्रु रणीं लढाया.
' भ्याले मराठे ' म्हणतो लढां या.
तो धैर्य दावी बुजवून कींरे !
झालों, अहा ! केवळ भ्याड सारे. ५८
हे अग्निनारायण ! धैर्य दे. हा !
झाले मराठे कुळहीन, पाहा.
गेले तिखें तें तुमचें कसें गा ?
घ्यावा इथें हा खुपसून तेगा ५९
स्वभावें मनीं भीति, नाजूक जात,
स्त्रिया भ्याड बोलूं जशा लागतात;
अशा बायका आज आह्मी न काय !
बरा मृत्यु आतां . नको जीव . हाय "
असें बोलतां म्यान बाहेर ओढी.
नव्हे स्वच्छतेगा; जणों सूर्य काढी.
पडे तेज त्याचें. दिपे सर्व वीर.
जणों ज्योत झाला पिलाजी हुशार. ६१
एका एकीं गर्क झालेच सारे;
जैसा योद्धा तो पिलाजी सरारे
वाटे आतां प्राण देणार कीं हा.
साऱ्या लोकां ठार मारील हा. हा !

सुटे मंद वारा. पडे तेज शुभ्र.
जशा चांदण्या त्या अभाळीं निरभ्र;
तशा बायका कीं दिसूं लागल्या त्या.
संख्या रूपवंत्या हि मौजेंत होत्या. ६३
'भित्र्या स्त्रिया' हें म्हणतांच वीर;
जाळींत होती गुणगूण फार.
हे शब्द त्याचे रुचले न त्यांना.
मंजूळ कोणी म्हणती विरांना. ६४
"मृदु खऱ्या, सुकुमार खऱ्या स्त्रिया.
बहुत लाज खरी, सकुमार या.
हसत खेळत स्वस्थ बसूं घरीं.
पति अर्धी मरणा न भिऊं तरी." ६५
मंजूळ वाणी पडतांच कानीं.
योद्धा पिलाजी हसला इमानी.
तो त्वेष, तो राग, निवून गेला.
पाहून जाळी मग थंड झाला. ६६

तान्हाजीचें स्वस्थता चित्त भोगी.
नाहीं घाई, शोभतो थोर योगी.
ऐके पूर्वी तर्क जे जे निघाले.
योद्ध्यांना त्या शूर निर्भीड बोले. ६७
"इथें पक्ष हे दोन झाले ठीक.
पडे ऊन, पर्जन्य. होतें सुपीक.
अर्धी घोर काळोख कीं कृष्ण पक्षीं;

पुढें तेज येतें हि. आपणास कशीं. ६८,
कोणी म्हणे ' युद्ध बरें.. खरें कीं.
झुंजून लावूं ध्वज आज लोकीं.
त्या म्लेंछ.लोकां बुडवून टाकूं.
ह्या शूर लोकांस नकोच कांकूं.' ६९
कोणी ह्मणे ' युद्ध करील तोटा.
कां ? स्वार्थ वाटे नमण्यांत मोठा.
तो म्लेंछ आहे बळवान आज.
रे ! मुख्य आहे पळण्यांत काज. ' ७०
हें चित्त सांगे लढणें बरें हें.
कां ? नम्र होण्यांत अब्रू नराहे.
वाटे तरी युद्धच सर्व नाशी.
युद्धीं धडांच्या पडतील राशी. ७१
हें युद्ध होतां मरतील लोक.
होईल सर्वांस उगीच शोक.
पहा ! तयारी कसलीच नाहीं.
घाईंत नाहीं उपयोग कांहीं. ७२
टळे युद्ध जेव्हां, टळूं त्यास यावें.
भिडे शत्रु जेव्हां, पुढें रे ! सरावें.
बरा, खास सल्ला, होतां न तोटा,
घडे काय तोटा, धरावाच सोटा. ७३.
रे ! मुख्य ही भूतदया असेना ?
पाहूं कशाला मम दोन सेना ?

जाऊं कशाला लढण्यास दूर ?
आला असे शत्रु कुठें समोर ? ७४
जाऊं चला, सर्व पळून. हाहा !
आहे असें हें मत काय. पाहा !
देवा ! कसें ह्या निकरास आलें ?
सारे मराठे बळहीन झाले. ७५
नसे अन्न जेथें, नसे धैर्य तेथें.
घडे फायदा कां ? नसे धैर्य जेथें.
अशी ही दशा. आज झालोंच पंगू.
करा युद्ध, किंवा पळा, काय सांगूं ? ७६
लढावें. पळावें. पळावें. मरावें.
कसें काय आतां गड्यानो ! करावें ?
करूं या इथें सर्व आतां विचार.
घडे फायदा काय युद्धांत फार ? ७७
कांहीं पळूं या; पळणें बरें हें.
कांहीं मरूं या; यश खास आहे.
दाहा मराठ्यांस हजार वैरी
कांहींच नाहींत. करूं तयारी. ७८

पिलाजी ह्मणे " युक्ति खाशी निघाली,
जिथें दीन कर्मे तडाक्यांत आलीं.
रुचे भीति ज्यांना, निघा ही ! पळाया.
असे शौर्य ज्यांना, चला या लढा या.
हे पक्ष दोन्ही रुचतात आतां.

ते म्लेंछ मारूं उडवून माथा.
काळीज हो ! धाडस ज्यास आहे
तर्वार घेऊन उठा. पहा हें." ८०
असें बोलतां थोर हुईहू उडाला.
मराठा सरारे, लढाया निघाला.
पुढें सर्व तर्वार बाहेर आली.
पडे तेज भारी. दिशा धुंद झाली. ८१

तों येसजी कंक तयार होतो.
"आहे" ह्मणे "संशय काय हो !" तो
ह्मा दोन हो ! युक्ति खऱ्या, खऱ्या ह्मा.
आहे कसें हें, जलदी पुसा ह्मा. ८२
पन्हाळा असा एकटा काय आहे ?
पहा एवढें थोरलें काम कां हें ?
जरी एक किल्ला मुसल्मान घेती;
तरी सर्व हा देश राहील हातीं. ८३
पन्हाळ्यावरी या लढाई घडे कीं,
मराठी बुडाली, असें हें विलोकीं.
मराठे पहा ! सर्व आहेत कोठें ?
लढाई घडे कीं, पडूं सर्व वाटे. ८४
करूं सर्व टोळ्या निराळ्या. चला चल !
उठूं या ! स्वदेशास मारूं लढाया.
जिथें शत्रु पाही, मराठा उभा हा.
नसे मोकळा देश कोठें. अरे ! हा. ८५

जसा काय वेताळ नाचे स्मशानीं;
जसी काय लागे पहा ! आग रानीं
जसा काय पर्जन्य आकाश घेरी;
तसे आज गांठूं चला दुष्ट वैरी. ८६
कोणी चला उत्तर बाजुला ह्या.
भाजा मुसलमान रणांत लाह्या.
कोणी चला दक्षण बाजुला. हो !
तेथें मराठा ध्वज नीट राहो. ८७
कोणी धरा ही मधलीच वाट.
गांठा चला कोंकण आज थेट.
हा खान जोहार चला वळाया.
आहे जसा कीं बकरें रणीं या. ८८
तरी तत्व हें; हा पहा मुख्य सार.
शिवाजी महाराज हा सूत्रधार.
बसो हा महाराज हो ! मध्य भागीं.
असो रांगणीं कीं असो अन्य जागीं. ८९
रणीं या मुसल्मान लोकांस गाळूं
धरूं शूर तर्वार, वैरी उगाळूं.
दिसे युक्ति खाशी. दिसे वाट खाशी.
चला या रणीं. हो! पडो शत्रु फाशीं. ९०
भरे हुंगऱ्हा. वीर ते स्वस्थ झाले.
चकाकां मुखांतील पाणी झळाळे.
पुढें शूर राजा दिसे उंच जागीं;
जणों चंद्र आहे; मनीं प्रीति जागी. ९१

राजा ह्मणे "निर्णय ठीक झाला.
आह्मां खरे शूर, रणीं निघाला.
तर्वार हातीं, रण माजवूं या.
त्या म्लेंछ लोकांस चला वळाया." ९२
ह्मणे एवढें शूर तर्वार काढी.
भवानी नवी ती दिसे लाल गाढी.
चकाके तिचें फार तेजाळ पाणी.
अफ्झुल्ला मरे, हें मनीं सर्व आणी. ९३
पुढें शिंगवाला उठे, शिंग फुंकी.
भरे शौर्य भारी महाशूर लोकीं.
तसा नाद होऊन हर्हर् उडाला.
लढाया रणीं हा मराठा निघाला. ९४

आला पुढें पंडित सुज्ञ थोर.
बोले " महावीर ! विचारशूर !
आतां लढाया सगळे निघाला ?
ऐका जरा भाषण. भीक घाला. ९५
फिरे देह हा, जों वरी प्राण आहे.
निघे प्राण कीं, हा कुठें देह राहे ?
तरी प्राण आहे कुठें अंतरंगीं ?
कळेना कुणाला. ह्मटे थोर योगी. ९६
आले वैरी कीं सांपडे देहमात्र.
आहे पक्का नाश होण्यास पात्र.
नाहीं चिंता. प्राण तो स्वस्थ राहे.

ऐशी पाहा ! ईश्वरी योजना है. ९७
तरी प्राण आहे महाराज अंगी.
लढावें न त्यानें अशा ह्या प्रसंगीं.
कुठें स्वस्थ चित्तें बसावें वनीं या.
खरी युक्ति या वीरलोका कळाया. ९८
जशी युक्ति हो ! मूळ आहे जयाचें;
जसें अन्न हें मूळ आहे जिवाचें;
जशी स्त्री असे मूळ, संसार हाकी;
जसें द्रव्य हें मूळ सौख्यास लोकीं; ९९
जसे पंख पक्ष्यांस देती उडाया;
जशी तीक्ष्ण तर्वार आहे शिपाया;
तसा शूर राजा मनीं नीट आणा.
जपारे! जपा. प्राण हा शूर राणा. १००
चला! सर्व आम्ही पडूं आज पायां.
म्हणूं या " न जावें लढायास राया.
लढूं दास आम्ही. स्वतां स्वस्थ राहा.
पहा देह आम्ही. तुम्ही जीव आहां."

असें बोलतां वीर ते सिद्ध झाले.
उभे राहिले, पाय पाहूं निघाले.
म्हणूं लागले " आज हें दान दे मा !
धरावा न हातीं महाराज, तेगा." १०२
हा शब्द हो ! कोमल फार झाला.
हा प्रार्थनेचा रंगला उडाला.

चित्तीं शिवाजी द्रवला खरा कीं;
ही प्रीति, हा प्रेमळ भाव, लाकीं. १०३
मुखीं तेज फांके; मनीं शौर्य माजे;
जरा बिंदु ढाळे; किती नेत्र साजे!
किती भाषणीं बोलतां रंग डोले !
धरी शस्त्र हातीं महाराज बोले. १०४

" शाबास ! शाबास ! विचारशूर !
हा वाद हो ! उत्तम खास वीर !
आहां मराठे समजूतदार.
हीं भाषणें सुज्ञ खरीं हुशार. १०५
नसे लोभ आम्हा, नसे क्रोध पाहा.
नसे डौल, वांच्छा, नव्हे सूड हा ! हा.
स्वतां त्रास देण्यास हे शत्रु आले.
स्वतांला तुम्हा रक्षणें भाग झालें. १०६
हे ईश्वरा ! सत्य पहा कुणा चें.
आहोंच निःसंशय आज साचे.
हे शत्रु आले स्वगृहास कां हा !
झाला असे थोर जुलूम पाहा. १०७
स्वदेशांत हे शत्रु चालून आले.
मराठे तरी सिद्ध हो ! आज झाले;
कसा फायदा आमचा युद्ध होतां !
नसे राहिला हो ! दुजा मार्ग आतां.
जर्री आमचें काम कर्तव्य आहे!

सदा वागवावी दया योग्य हो ! हें.
दया सारखी सर्वभूतीं असावी.
नसे शत्रु कोणी, अशी वृत्ति व्हावी. १०९
क्षणिक युद्ध, असें समजा वरें.
सकळ बंधु समान. पहा खरें.
उपजतां अधिकार जसा जडे.
यवन, मांग, महार, असें घडे. ११०
तरी शत्रु नाहीं. जगीं मित्र सारे.
मुसल्मान हे शत्रु झाले कसे रे ?
जरी युद्ध व्हावें, मनीं खास नाहीं.
जरी शांति व्हावी, असे वासना ही. १११
तरी संकटें दोन आलीं पुढें कीं.
स्वदेशास सोडूं, जुपूं युद्ध लोकीं.
लढाई नव्हावी, असा धर्म आहे.
स्वदेशास रक्षावया धर्म पाहे. ११२
असे धर्म आले पुढें दोन आतां.
घडे पुण्य मोठें, रणीं युद्ध होतां.
टळे युद्ध जेव्हां, टळूं त्यास यावें.
घरीं शत्रु येतांच हात्यार घ्यावें. ११३
जरी दोन दुःखें पुढें आज येतीं,
कमी कोणचें, तें स्वतां शुद्ध घेती.
मुसल्मान मारूं, स्वदेशास सोडूं,
स्वदेशास रक्षूं, मुसल्मान झोडूं. ११४
पहा नीत येथें हि सोपेंच आहे.

तरी आळवीं जीव हातांत कां हे ?
तरी युद्ध हें आज चालून आलें.
मराठे मशीवास ह्या सिद्ध झाले. ११५.
तरी जों वरी भाग आहे कुडींत;
करूं धर्म हा. काय आहे उर्डांत ?
बुडे शत्रु, तों हानि होती स्वतांची.
पडे मित्र कीं, कीर्ति ऐशी रणाची. ११६
मराठे मराठे खरे वीर शूर.
तुह्मी सर्व केला मनीं हा विचार.
जसें बेतलें युद्ध; झालां तयार.
चला शौर्य दावूं रणीं सर्व फार. ११७
रे वीर आहां, बसलां पुढें हें.
तो भीष्म, तो अर्जुन, काय आहे ?
हे शत्रु मारूं स्वपराक्रमानें.
रे ! चंग बांधून चला क्रमानें. ११८
पिलाजी सर्वे रांगण्याला निघालों.
अशी प्रार्थना ही पहा ! सिद्ध झालों.
तरी कोण जातां रणीं ह्या लढाया ?
पुरे एक कोणी मराठा. चला या. ११९
दुजे सर्व जा आपलाल्या ठिकाणीं.
धरा शत्रु कीं आज पाजाच पाणी.५
महाराष्ट्र देशीं शुभाव्ही करा. हो !
इथें औषधाला हि वैरी न राहो. १२०
तरी कोण जाती ? रणीं स्नान आला.

तयारी करा. कोण हो ! सिद्ध झाला ?
सर्वे दोनशें घ्या मराठे हुशार.
मुसल्मान आहेत बारा हजार. १२१
सरदार ते काकुळतीस येती.
होती चढाओढ ' मला मला ' ती.
हातांत तर्वार उभे तयार.
" आज्ञा मला हो " ह्मणतात फार. १२२
" जाणार मी. हो ! निघणार हो ! मी.
अर्पीन म्लेंछयां रणरूप होमीं.
हा प्राण जावो. पण कीर्ति व्हावी.
जाणार. आज्ञा मजलाच द्यावी. " १२३

ते वीस योद्धे रणरंगधीर.
आले पुढें शूर नृपासमोर.
हे शूर वैरी गणतील सारे.
हा कर्ण. हा अर्जुन. भीम हा रे ! १२४
राजा विचारांत पडे खरा हा.
आज्ञा कराया नकळे. अहाहा !
हे सारखे सर्व रणीं निघाले.
तें गुंगलें संशय चित्त प्यालें. १२५
राजा धृडा कीं करतो जिवाचा.
ही भीत बोले मग शूर वाचा
" आहांत योद्धे लढणार शूर.
हे देशपांडे निघतील वीर. १२६

बाजी ! पहा ! तोफ उडेल जेव्हां;
तूं युद्ध झालें, म्हणशील तेव्हां.
ये रांगण्याला श्रम भागण्याला.
वा ! सिद्ध रे ! तूं बळ दावण्याला." १२७
हर्हर् महादेव तसा उडाला.
आवाज् हा एकदमांच झाला.
ते वीर सारे निघती निराळे.
मोठें मुखीं तेज पहा ! झळाळे. १२८
येती निराळे मुजरा कराया.
बोले हळू कोमल सुज्ञ राया—
"हें विघ्न आहे अति घोर. पाहा !
ते म्लेंछ वैरी समजून राहा. १२९
पीडा जनाला बहु दुष्ट देती.
झोंपेंत ठेवाच कटार हातीं.
युद्धा विना देश सुटेल कां हा ?
युद्धीं तरी फार हुशार राहा." १३०

आतां सभा शूर खलास झाली.
तों मंडळी खेळकरी निघाली.
नाना तऱ्हेचे रचतात डाव.
ते शूर योद्धे करती चढाव. १३१
कोणी उठे बैठक मारण्याला;
दाबी, सुटे जोंवर घाम त्याला;
तेव्हां धरी रंगण पारवा कीं;
भारी घुमे; पाय मजेंत टाकी. १३२

झाडास कोणी धरतो तऱ्हेनें.
तो मांडला हा मलखांब त्यानें.
तों पीळ त्याचे दिसती कसे हे ?
झाडावरी वेल लपेटलाहे; १३३
मारी उड्या मंडल नाचतें कीं,
तो चक्रसा दूर उडीच फेंकी;
आला पुन्हा; हात शिवे जरा तों,
शेंड्यावरी तो अडकून जातो. १३४
कोणी जसा वानर तीक्ष्ण आहे,
फांद्यांत ओळंबत शूर राहे;
हातांत डाव्या पकडून ढाळी,
ठेवी शरीरा मग अंतराळीं. १३५
कोणी गरारा घिरट्या धरी कीं;
नाचे जसा काय पतंग झोकीं;
हें फूल पाही, रमतो खुशाल.
घेतो जरा वास, पुढेंच चाल. १३६
कोणी पळे नीट, निघे ससाणा.
ती धूम, तो वेग, मनींच आणा.
तो वायु फांके, जळ जेवि आहे.
मोठी खरी धूम. न दृष्टि राहे. १३७
कोणी जसा मच्छ दिसे जलांत;
आहे जरा स्तब्ध पुढें पहात;
मारी लपेटा; जलदी करी कीं;
तो नागमोडींत झुके, विलोकीं. १३८

कुस्ती धरी शूर मजेंत कोणी;
ते पेंच. भारी पकडींत पाणी.
झुंजे जसा बैल ह्मणून शिंग;
एथें दिसे केवळ तोच रंग. १३९
कुत्रे जसे काय मजेंत येती;
ते मारती शूर उड्या सभोंती;
धांवून सारेंच शरीर फेंकी;
लोळे, उठे, दंड मजेंत ठोकी. १४०
कोल्हाळ्यांचा चालला एक रंग;
एका मागें एक ते शूर दंग;
चाले जैसा ऱ्हाट, योद्धे निघाले.
एका पाठीं एक डौलांत गेले. १४१
करी मोहरा मस्त हत्ती वनांत;
धरी सोंड, लावी जमीनीस दांत.
पुढें नाद मोठा करी; नेत्र लावी;
तसा शूर कोणी करी; रंग दावी. १४२
जसा वाघ चाले वनीं आडवाटे;
धरी पुच्छ खालीं; शरीरास पट्टे;
पुढें डोंगरीं तो जरा गप्प होतो;
कडा सोडतां दूर दृष्टी पडे तो; १४३
उडी मारतां किंकळी क्रूर ठोकी;
वळे पाठमोरा; पुढें दृष्टि फेंकी;
फिरे, रान हिंडे; धरी श्वापदाला.

शिकारी असा शूर कोणी निघाला. १४४
धरी विंचु पाठीवरी जेवि नांगा,
हळू पाय टाकीत तोलीत अंगा;
किती डौल त्याचा ! कसा झोक त्याचा !
असा वीर कोणी दिसे. रंग साचा. १४५
हातांवरी जोर दिला; निघाला;
तोली शरीरा, उलटाच झाला;
पाठीवरी पाय, मजेंत चाले;
हा विंचु कीं काय ? मनांत आलें. १४६
जसे नाग कोणी उभे ताठ होती;
जुळी बांधती, एकशी मूर्ति होती;
वनीं एकटे भोगती मौज कोठें;
तसे वीर दोघे उभे आड वाटे. १४७
टेंकून डोकें मग अंतराळीं;
झाले उभे, पाय वरी अभाळीं;
दोघां जणांच्या विळखे शरीरा;
झाला जणों सोटच एक सारा. १४८
तुरा मस्तकीं लाल, तो डौल भारी;
उड्या मारतां पंख नामी उभारी;
पुढें मान काढी, करी नाद थोर;
जसा कोंबडा, नाचतो थोर वीर. १४९
मेंढे जसे टक्कर दोन घेती,
योद्धे तसे; नाद उठे सभोंती.
कोणी हणी मस्तक, झाड मोडी;

कोणी हणी लाथ, समूळ पाडी; १५०
भडीमार चाले, नसे अंत कांहीं;
झणाणें जरा रान, हो स्तब्ध राही.
इथें माजला खेळ चेंडू लगोरी.
तिथें पाट मुर्दंग, उडे मौज भारी. १५१
इथें कुघोंडी, झुले वीर पाहा;
पुढें थोपटी पांठ, खालीं पडे. हां !
उडी शूर मारी जसा काय घोडा;
उभे पांच हातांवरी, भ्रांति सोडा. १५२
खबुतरें उडती, करती गिरे;
नवल काय ? खरोखर पांखरें;
पळत वीर सुटून करी गिरा;
मग फिरे सुलटा उलटा खरा. १५३
असी मौज चाले; असा खेळ चाले;
अकस्मात् तिथें गारुडी दोन आले;
चलाला झलाला असे शब्द केले.
तसे खेळ त्यांचे पुढें बंद झाले. १५४
राजा शिवाजी हसला मनीं कीं;
'हें सोंग ऐसें कळलें न लोकीं.'
बोले "अहा ! नाचत मौज आली.
दावा तमाशा, तुमची जलाली." १५५
म्हणे वीर कोणी नव्हे गारुडी हा-
बहिर्जी ! बहिर्जी ! भलें सोंग, हा हा !
हसूं लागले, मौज झाली खरी ही.

उभा बाजुला तों बहिर्जीहि राही. १५६
तो हात जोडून म्हणे बहिर्जी,—
" म्या पाहिलें तें चरणा कळो. जी !
म्या गांठली कोंकण देशपट्टी.
ती बादशाही शिरजोर मोठी. १५७
बांधा, धरा, हो ! रगडा ह्मणा कीं;
चेंचा, कुटा, हें सुख सर्व लोकीं.
' कोणी मराठा नजरेस येतां,
कां सोडवाना ? ह्मणतात कांता. १५८
आह्मावरी भीति खरीच आहे.
ते लोक सारे भजती नृपा हे !
जो राज्यभारास जपून वाहे;
राज्यांत ज्याच्या बहु सौख्य राहे. १५९
कोणी असे सुंदर पुरी वनांत.
तीं दाट झाडें, रमलों मनांत.
पाणी झऱ्याचें स्फटिका समान.
पक्षी मजेनें ह्मणतात तान. १६०
होतें तिथें अंगण स्वच्छ एक.
शोभे किती मंडप ! काय झोक !
पाणी पुढें सोज्वळ स्वच्छ वाहे.
हें स्थळ हो ! सुंदर फार आहे. १६१
त्या नारळी, कोमळ पोफळी रे !
तें मंद रे ! शीतल गोड वारें.
हिंडून रानीं श्रमलों असें मी.

वाटे बसावें मग रे । निकामी. १६२
जरा स्वस्थ झालों. वनीं शांत झालें
रडें घोर ऐकूं घरांतून आलें.
मनीं धक्क झालें. पुढें धीर केला.
मुसल्मान कोणी झटाटां निघाला. १६३
सौंदर्य माजे; रमणीय नार;
आहे जवानींत; नवा बहार.
शोभा मजेची. बहु तेज फांके.
ती चालतांना सुकुमार वांके. १६४
डोळ्यांत लाली, सुशरीर कांपे.
झोंबे मुसल्मान, मनांत तापे.
ओढी तिला, तों रडती सुबाला.
सीते पुढें रावण दुष्ट आला. १६५
गरकलों, मग मी फिरलों, पहा !
कळवळा सुटला ह्रदयीं. अहा !
जवळसा वळसा ह्मणतां भिडे.
सुतनु कोमळ सुंदर ती रडे. १६६
तों कोपलों, त्वेष मनीं न माये.
'आलों मराठा ह्मणतों पुढं ये.'
भ्याला मुसल्मान, पळे पुढें कीं,
ती सुंदरी सुज्ञ ह्मणे " विलोकीं १६७
घरीं दुष्ट माझ्या शिरे ह्वाड मेला.
जळो तोंड त्याचें मला त्रास केला.
तुह्मी कोण आहां ? नव्हे गारुडी कीं.

मला सर्व सांगा. मिळी कीर्ति लोकीं. १६८
'खरा गारुडी मी' असें बोललों हें.
पुढें चाल केली, जिथें मार्ग वाहे.
निघालों, तसा मांड देशांत गेलों
पुढें चालतां ह्या कऱ्हाडास आलों. १६९
उडे कीर्ति माझी पहा गारुडी हा.
मला काय बोलावणीं कीं. अहाहा !
ह्मणे नूरजानी अरे 'द्रव्य देतें.
तमाशा तुझा दाव. आश्चर्य होतें.' १७०
तसा मी निघालों, तसा बेत झाला.
जिथें फार शोभा, तमाशा उडाला.
जमे वीर सारा, जमे म्लेंच्छ सारा.
दिला एक होता पहा ! थोर डेरा. १७१
ती नूरजानी बसली मधें कीं
तो फाजिला म्लेंच्छ बसे, विलोकी.
तो बेत, ती छान, मनांत आलें.
'हा नाश होणार. नशीब झालें.' १७२
घमघमां सुटतो मृदु वास. रे !
जळ उडे. फिरती घन पांखरें.
गवत दाट. वरी बसवी फुलां.
सहज, हस्तकळा, नकळे मला. १७३
मधें मच्छ नाना मनीं रंग-आणीं.
उडे अष्ट पैलू, फिरे स्वच्छ पाणीं.
फुलें लोळती. कोण केली अरास !

जसा कृष्ण खेळे जगत्त्रयात रास. १७४
प्यालों हंडा एकदां, म्लेंच्छ भ्याले.
सापांचें मी छानसें चक्र केलें.
झालों राजा, द्रव्य केलें उदंड.
मारी पोरा, मांडला राज दंड. १७५
खुले नूरजानी; खुले फाजिला तो;
हसे म्लेंच्छ सारा; असा रंग होतो.
मधें खान जोहार आला स्वतां तो;
धरी पत्र हातीं; पहा दांत खातो. १७६
उठे फाजिला, बाजुला कीं निघाला;
ह्मणे '-खान साहेब कां त्रास झाला ?
असे कोण वैरी ? कुठें चोर आले ?'
तसें खान यानें पुढें पत्र केलें. १७७
पत्रीं असा हा मजकूर होता—
'झालास जोहार लबाड आतां.
देतात रे ! लाच तुला मराठे.
कां हा पन्हाळा न मिळेल ? वाटे.' १७८
मनीं त्रासतां तो पुढें खान बोले—
'खुळा बादशाहा. मनीं व्यर्थ काळें.
नको फौज आह्मां. नको कीर्ति आतां.
नको हा पन्हाळा. नको शूरवार्ता.' १७९
तसा फाजिलाला महानंद झाला.
बुडे खान; कीं रंग माझा उडाला.
ह्मणे खान साहेब ! हा बादशाहा !

चला ! फौज सोडा. धरा वाट. हा हा ! १८०
तशी फौज सारी भयें गर्क झाली.
मुसल्मान सत्ता खरी हो ! बुडाली.
शिवाजी ह्मणे "खान रे ! नम्र आहे.
तसा फाजिला तो मनीं गर्व वाहे." १८१
तमाशा पुढें बंद केला. निघाले.
'कसा काय हो ! बेत ? ऐसें ह्मणाले.
अशी मौज झाली. पुढें मीहि आलों.
मुसल्मान पाहून मी तृप्त झालों. १८२

ह्मणे तो शिवाजी अर्थी सांग सारें.
गड्या ! हें बहिर्जी ! न ठावें मला रे !
कुणी कीर्ति केली मराठ्याविरांनीं ?
कसे कोण आहेत देशाभिमानी ?" १८३

म्हणे तों बहिर्जी " महाराज ! ऐका.
मराठ्याविरांचा खळेनाचि डंका.
निलाजी महावीर हो ! शौर्य दावी.
पिलाजी हणी फौज, केव्हांहि यावी. १८४
तान्हाजीची योग्यता थोर आहे.
घेतां नांवा म्लेंच्छ भ्याले. पहा ! हें.
नेताजी तो शूर योद्धा खरा कीं;
ठावा पक्का वीर हा म्लेंच्छ लोकीं. १८५
अबा हा महाशूर ते शत्रु ठोकी.

तसा देशपांड्या मुसल्मान हाकी.
कसें नांव घ्यावें कुणाचें, सुचेना.
कुणी रे ! मराठा कुठी म्लेंच्छ सेना. १८६
निळाजी असे शूर, किंवा पिलाजी,
कळेना कुणालाचि. दोघे हि गाजी.
पहा ! सर्व देशीं खरी कीर्ति झाली.
अशी शोभती ही मराठी निराळी. १८७
जिथें पाय ठेवूं, तिथें सर्व बोले.
मराठे महाशूर योद्धे निघाले.
हणा क्रूर वैरी. निघाहो ! लढाया.
करा मुक्त आम्हा. चला ! सोडवा या" १८८

" तुम्ही शूर आहां. " म्हणे तो शिवाजी.
"मजा आज केली खरी त्वां बहिर्जी.
पुरे बोलणें. तूं जरा शांत हो जा.
मराठे महावीर मारोत मौजा. " १८९
असें बोलला तो महाराज शूर.
पुढें चालला सुज्ञ माते समोर.
धरी पाय, तों ती म्हणे माय " हा हा.
नको. रे ! पुरे. रे ! मनीं शांत राहा. १९०
चला रांगण्याला अशा ह्या प्रसंगें.
अर्धी मीच जातें, असो शंभु संगें.
अशा ह्या प्रकारें कमी त्रास आहे.
स्त्रियांच्या मनीं भीति निःशंक राहे. " १९१

" आज्ञा " म्हणे वीर " अगे ! बये गे !
घ्यावा पिलाजी बहुशूर संगें.
ठावे तुला सर्व. वीचारशील !
आज्ञा तुझी मी करणार मूल. " १९२
निघे रांगण्याला तसी सुज्ञमाता.
सवें शंभु चाले लडीवाळ आतां.
शिवाजी म्हणे " थोर हे ईश्वरा रें !
दयाशीळ संभाळणारा. मुरारे ! १९३
पुढें भेटली ती जिवाचा विसावा.
म्हणे सुज्ञ राजा "किती गोड हावा !
पडे वृष्टि ही; त्रास सारा निवाला.
पडे तेज; काळोख सारा उडाला. " १९४
मुरकतां हसतां झळके सखी.
कमलजा न दिसे हिज सारखी.
मग म्हणे "खुलती बहु रोहिणी,
जवळ चंद्र; जरी लघु चांदणी. " १९५
राजा म्हणे. " सुंदर रोहिणी गे !
गे ! रांगण्याला निघण्यास लागे.
ही मीती गे ! गोड मनास भेदी;
तर्वार जैशी रणशूर छेदी.
असें बोलतां सिद्ध राजा निघाला.
सवें स्त्री निघाली बहिर्जीहि आला.
जणों चालली राम सौमित्र सीता.
पुढें रान लागे अतोनात आतां. १९७

राजा शिवाजी.

भाग ५.

हा खैर. ही गोरख चिंच थोर.
ही गोंदणी. भोकर ही समोर.
ही पांढरी. उंबर हा निघाला.
एथें महावृक्ष चढून गेला. १
महावृक्ष हा वृक्ष विख्यात आहे.
जसें मांडलें तें तसें नांव राहे.
असा धर्म सालींत नांदे विचित्र.
दिसे वृक्ष हा थोर कीर्तीस पात्र. २
ही अंजनी. सावर माजली ही.
हा रानचाफा. असनास पाही.
ह्या कांचना कांचनरंग आहे.
हा घेर पिंभी पसरून राहे. ३
ज्याची महा कीर्ति, अशोक वृक्ष.
शिखा. शमी. चंदन. याच लक्ष.
हा-चांद. हा शेंड. पतंग. काजू.
वेळू पहा ! हे धरतात बाजू. ४
पारंब्या ह्या लोंबती कीं सभोंती.
वाऱ्यानें त्या डोलती. मौज होती.
रानीं माजे हा वडाचा पसारा.

फांद्या मोठ्या, गांव माईल सारा. ५
तें झाड; त्याच्यावर वेल चाले.
त्याचे पहा ! पीळ फिरून गेले.
तो झाड बांधून पिळून टाकी.
झाडा संभोंती विळखे विलोकीं. ६
भरे वृक्ष भारी; पहा ही कठारी.
कुडा, मेस, हें रान सर्वत्र घेरी.
पहा पायरी, दाट अपटा हि, गेळ.
कड्याचा कडा ग्रासते रानकेळ. ७
शंखासुराच्या पिवळ्या फुलांनीं.
शोभा चढे सुंदर फार रानीं.
तो उग्रसा पिंपळ डोंगरांत
घाली मुळ्या खोल, उदास, शांत. ८
लोंबे शिळा, ती अवळी मुळ्यांनीं.
ते पीळ त्याचे रचती कमानी.
मोठी शिळा ही पडणार खालीं.
तेव्हां मिठी तीस जपून घाली. ९
करमळी. कमळी. बकुळी भली;
मधुर वास; मनोहर सावली.
करमरी. फुलली. वनआवळी.
करवती, तिटवी, जड किंदळी. १०
मशाली प्रमाणें जळे सोट जीचा;
पहा ! माकडी, प्रांत घेरी वनाचा.
जमे मोह फांद्यांवरी, मोह माजे.

पहा मक्षिका ह्या. किती रान गाजे ! ११
जाती किती ह्या वर अंतराळीं !
येती किती ह्या। मध मोह गाळी.
पोळ्या मधाच्या हलतात एथें;
तीं अस्वलें गोंधळतात जेथें. १२
नान्या. मती. जांभळ. रानबिब्बी.
ही धामणी. बाभळ. ही बुरंबी.
ही नांद्रुकी. ही कटकी. बदाम.
हा टाकळा. तोरण ही. नराम. १३
हा सोनचाफा; पिवळीं फुलें हीं.
ही वांग माजे; करवंद पाहीं.
चेरा, तुरी, सोंडद, कार, हेंदी.
ही साजणी. ही गुलमोर. शिंदी. १४
रामाटा हा. केतकी. वेत पाहा.
आंबेरी ही. बाब ही. वारसा हा.
पिंड्री. जांबा. वावळा. रायबोरी.
झाडें झाडें. एक गर्दीच सारी. १५
भरे टेंक सारें. भरे खोल घोल.
जमे आमणी ही. पहा घोर ढोल.
पहा काजरा, रान चाफा, सुरंगी.
किती वृक्ष एथें उभे घोर, जंगी ! १६
मोठा मधें साग निघे अभाळा.
फांद्या पहा. घेर किती निराळा.

हीं रुंद पानें गळती सभोंती.
छायेंत याच्या झुडपें न येती. १७
अंबा पहा हा. पसरे हि चिंच.
गेलें तिचें टोंक वनांत उंच.
हा ताड मोठा गगनास लागे.
दाटी नमे. सुंदर रान मागें. १८
ही कौंडळी. बेल हि बाजुला हा.
शोभे इथें हें फुलझाड. पाहा!
रानांत जाई फुलली, पहा कीं.
हा वास, हा रंग, नसेच लोकीं. १९
असें लागलें डोंगरीं रान घोर.
किती टेकड्या! उंच विस्तार फार.
कुठें टोंक बाहेर येतां दिसेना.
कुठें खोल खालीं किती, हें कळेना. २०
कडे, भेगळा, पोकळी, खोल ढोली.
दरे, आडवाटा, गुहा, दाट जाळी.
वरी उंच पाठार ह्मैषासुराचें,
जिथें डोंगरी शब्द भेसूर साचे. २१
पडे रात्र, तों घोर काळोख माजे.
नमे दाट झाडी, जिथें वाघ गर्जे.
सभोंवार तें रान. चाले शिवाजी.
सर्वे चालती सुज्ञ राणी, बहिर्जी. २२
राणी ह्मणाली. "सुकुमार कांता!
हा वाघ गर्जे. भय फार आतां.

वस्ती भियाहे। करणार कोठें ?
पायांत या शक्ति नसेच, वाटे. २३
आतां कधीं हें सरणार रान ?
हा त्रास होतो मरणा समान.
रे। शत्रु आले छळण्यास कां हे ?
ही टेकडी कोण भयाण आहे। २४
कठिण फार कडा. चढती पहा.
घसरणी दिसती कसल्या अहा।
भुसभुसीत जमीन. खडे असे.
न उचले मज पाय. करूं कसें ?" २५
राजा शिवाजी ह्मणतो. " प्रियेगे।
बोलूं नको. पाय उठीव वेगें.
चोरून चोरून जपून चाल.
येतील ते शत्रु; पडेल घोळ." २६
चुके पाय, तों बैसली सूक्ष्म राणी.
सुटे कांप, नाजूक डोळ्यांस पाणी.
ह्मणे प्राण माझा, धरी हात राजा.
उठे सुंदरी, तों पुढें मार्ग ताजा. २७
बहिर्जी निघाला, पुढें दूर गेला;
कशी वाट, हें सर्व पाहून आला;
ह्मणे. " त्रास थोडा. पुढें वाट आहे,
जरी रान खोटें; तरी मौज राहे. २८
धनगरांत घुसून जरा बसूं.
धनगरीण तुह्मी ह्मणतां हसूं,

जवळ फारच सोज्वल झोंपडें.
अनुभवूं मग, जें सुख सांपडे, २९
धनगरांत असे बहु सत्य. जी !
वचन तो न कधींहि पहा ! त्यजी.
हळु हळू तिकडेच तरी निघूं.
मदत ईश्वर. कष्ट कसे बघूं !" ३०
राजा ह्मणे. " ठीक गडया ! खरें हें.
ओझें शिरीं हें सुकुमार आहे.
घेऊं विसावा, समजूं प्रसंग.
माझे सखे ! ये. कोमल काय अंग !"
ह्मणे सुज्ञ राणी. " असे दैव थोर.
करूं काय मी ? हो ! किती आज घोर !
शिरीं बायको वागवावी विरांनीं,
अशी रीति आहे तरी ही पुराणी." ३२
बसे मेंढरूं तें सभोंवार रानीं.
खडापाहरा. शूर कुत्रे इमानी.
मधें बाजुला झोपडी आड हो ती.
मनुष्यें तिथें रानटी दोन होतीं. ३३
लंगोटीचा झोळ लोंबे सभोंती.
बांधी मोठी कोयती बाजुला ती.
झिंज्या भारी मस्तकीं शोभती कीं.
खांद्यावर तो लांब वांशास टाकी. ३४
अशी मूर्ति ही दूर रानांत जाती.
जुमानी न काळोख. नाहींच भीति.

पुढें रानजांभास तोडून आणी.
इथें स्वस्थ झाली जरा सुज्ञ राणी. ३५
धनगरें मग तें फळ आणिलें;
जवळ नम्रपणें बहु ठेविलें.
मग ह्मणे. " मज काय कळे बरें ?
धनगरास मिळे फळ हें खरें." ३६
राजा शिवाजी उचली फळाला;
सोलून फोडून पिळी रसाला;
तें गोड पाणी कुडच्यांत घेतो;
तोंडांत स्त्रीच्या मग घालतो तो. ३७
नवा जीव आला. हुशारी भरारे.
भुले त्रास सारा. निवे दुःख सारें.
खुले तेजभारी; शरीरांत पाणी.
मनीं शांत होतां, ह्मणे गोड राणी. ३८
" मधुर हा रस हो ! सहजा मिळे.
अमृत हा रस काय, पितां कळे.
धनगरास दिलें सुख ईश्वरें.
रण कशास असें लढतां बरें ? ३९
पक्कान्न हें. ही रुचि काय आहे !
राजा जरी. हो ! मग दुःख कां हें ?
तें युद्ध खोटें. वन आज खासें.
लावी पहा ! भ्रांति गळास मासे." ४०
हे बोल कानीं पडतां खुशाले;
संतोष मानी; मग राज बोले.

"आहे तुला भ्रांति, मला कळे. गे !
हा त्रास आह्मा बहु गोड लागे. ४१
नव्हे युद्ध हें. ही दया थोर आहे.
नव्हे राज्यवांछा. खरें कर्म गे ! हें.
कळेना तुला, सौख्य कोठें वसे तें.
जना सौख्य होतां, मला सौख्य होतें. ४२
क्षणिक देह. करा उपकार हा.
सकळ भाव दुजा लटका. पहा.
श्रम सदा करणें पडतें गळां.
मरण दुःख गमे मज सोहळा. ४३
मरूं आज सारे. करूं सौख्य लोकां.
तरी सौख्य माझें. मला काय धोका ?
टिके दुःख कैचें ? जिथें शांति कांहीं.
स्वदेशी जनांला मुळीं त्रास नाहीं." ४४
तसी स्त्री ह्मणे. "धर्म आहे खरा. हो!
स्वदेशीं सदा सौख्य लोकांत राहो.
सुखी लोक हे. रान हें गोड, शांत.
कसी पेटती आगटी ही वनांत! ४५
चुटकिनी वळतें, पळतें कसें!
दडत धांवत धांवत येतसे.
चिमुरलें, जणुं कोमल लेंकरूं.
मज किती सुख! संगत कोंकरूं. ४६
झळकते बहु सोज्वळ आगटी.
चपल फार सख्या! पशु रानटी.

जसजसें बघतेंच उजेड हा.
तसतसें खुलतें, उडतें. पहा ! ” ४७
बहिर्जी ह्मणे. “फार विश्रांति झाली.
चला हो ! निघा. वाट ही नीट गेली. ”
उठे बायको, तों उठे शूर राजा.
ह्मणे सुज्ञ राणी. “गड्यानो ! चला, जा. ४८
धनगरा, जप सुंदर कोंकरूं.
हयगईस कधींहि नको करूं.
धनगरा, चल, घे धन हें तुला.
मज मुळें कर जा सुख ह्या मुला. ” ४९
पुढें ते निघाले; जरा वाट गेली;
मनीं शांत झाले; पुढें चाल केली.
जमे दाट झाडी. घुसे वाट आंत.
हले पान कोठें ? असें रान शांत. ५०
तों गुंफले वृक्ष भयाण मोठे.
ती रान झाडी चिकटून खेटे.
फांद्यांत फांद्या अडकून जाती.
पाषाण मोठे पडले सभोंती. ५१
गुरफटे भलतें वन ओंगळ.
तळमळे उलटी वनवाघुळ.
किणकिणा घुमती बहु रात्र ती.
सकळ शांत. सखी भय मानती. ५२
भिताड मोठें अडवें ह्मणों हें.
भ्याला शिवाजी. वन काय आहे !

तो स्तब्ध झाला, नकळे उपाय.
मार्गे करी ती सुकुमार पाय. ५३
पुढें वाट नाहीं. दिसेनाच कांहीं.
तसा तो बहिर्जी उभा स्तब्ध राही.
जरा दृष्टि लावी; घुसे तो वनांत;
चुके वाट; तेव्हां खिजे कीं मनांत. ५४
पुढें थांग लागे; तसा शांत झाला.
“ महाराज ! आतां शिरा. ” तो ह्मणाला.
शिवाजी शिरे, कीं धरी झाड हातीं.
दुजा हात राणी धरी घट्ट हो ! ती. ५५
हातास कांता चिकटून राहे.
मागें बहिर्जी जपणार आहे.
वांके महाराज, लवून चाले.
तों सुंदरी ती सुकुमार बोले. ५६
“ ही वाट आहे खडतार मोठी.
माझे सख्या ओंगळ भीति पोटीं.
वांके जसी मी, भय फार वाटे.
पाहा ! पुढें हे पडलेत गोटे. ५७
राजा ह्मणे. “ ये. जपणार देव.
विश्वास त्याच्या वर आज ठेव.”
तो पाठमोरा सहजाच झाला;
ती हास्यचर्या सुकुमार प्याला. ५८
सुतनु मंद पुढें मग चालली.
पदर ती गुततां हळु बोलली.

" मज घरी वनवृक्ष कसा बरें !
जवळ शूर असे असतां खरें." ५९
हसत राय ह्मणे तिज. " शाहणे !
पद्र सोज्वळ हा मज काढणें.
तुज सवें सुख गे बहु या वनीं.
बहु मनोहर ही तनु मोहनी." ६०
तों किरं झाडी सरली; निघाले.
ती वाट आतां सरळीच चाले.
तें स्वच्छ आकाश वरी झळाळे.
झाडींत होतें सगळेंच काळें. ६१
राणी मजेनें बघती वनाला.
त्या टेकड्या कीं भिडती अभाळा.
तें शांत, तें भव्य, विशाळ रान.
वाजे जिथें पाय. भितो हि कान. ६२
दोन्हीकडे डोंगर ते निघाले.
मध्यें असे ओहळ; वाट चाले.
खेटे दुतर्फा घन रान झाडी.
हीं श्वापदें ! बंदुक कोण झाडी. ६३
तों वाघ गर्जे. वन फार गाजे.
त्या किंकळीचा पडसाद माजे.
कोठें पुढें दूर कडाड होतो.
वाघीण, तो वाघ समोर येतो. ६४
हळू चालती वाघ वाघीण दूर.
कडा दाखवी त्रीस राजा हुशार.

ह्मणे " हेप्रिये ! पाहशी काय रंग ?
कशी वाघ वाघीण मौजेंत दंग। ६५
पुढें वाघ चाले, सवें ती हि चाले.
पहा ! धांव त्यांची. झरारां निघाले.
उडी वाघ टाकी; उडी ती हि टाकी.
किती सुस्तही चाल ! दोघां विलोकीं. ६६
दोघे पहा ! काय समोर आले ?
तो डौल त्यांचा. मन दंग झालें.
ते टेकडींतून पहा ! निघाले.
शेंड्यावरी दूर भयाण गेले. ६७
भ्या वाघणीला वळणांत पाहीं.
ती भीति त्यांची, बघ आज कांहीं.
घाले वनीं ह्या बळवान वेगें;
ती स्त्री निघाली रमणीय सगें. ६८
हा रंग पाहून मनांत भ्याली;
मारी मिठी; हात गळ्यांत घाली.
स्त्री कांपती फार, न शुद्ध कांहीं.
पोटीं तिला राज धरून पाही. ६९
ह्मणे शूर राजा. " अगे ! भीति कां ही !
वनीं त्रास आह्मास होणार नाहीं.
ह्णूं वाघ वाघीण. तूं स्वस्थ राहा.
अशी भीति आतां कशाला ? अहाहा"। ७०
बहिर्जी ह्मणे. " टेकडी ही समोर.
चढायास लागे. धरा आज धीर.

असे उंच थोडी. तरी त्रास आहे.
मला ठाउकी. पाय तेथें न राहे. ७१
चढण थोर. कडा सुळका जसा.
वळण फार नसे. दमतो ससा.
दमभरे चढतां, खचतें मन.
जवळ, दूर, भयाण दिसे वन. ७२
डोळा फिरे कीं. न शरीर तोले.
हा ! झोंक जातो. न उपाय चाले.
डोळ्यापुढें तों पिवळें चकाके.
तों झीट येती. जग सर्व झांके." ७३
असें बोलतांना, पुढें ते निघाले;
चढूं लागले टेकडी. वीर बोले—
"धरी हात माझा. हळू पाय ठेव.
प्रिये घालसी गे ! अहा काय आव ! ७४
बळकटां खचल्यास निऱ्या. गडे !
फिरवितां पदरास, तिढा पडे.
पदर हा वर सुंदर खोवशीं.
उचलशीं वर झोळ निऱ्यापशीं. ७५
गे ! प्राण माझा, धरतीस खोंचा.
ह्या डोंगराच्या बघ खांच खोंचा.
माझे सखे गे ! दमलीस आतां.
हा ! झोंक जातो. धर घट्ट हातां." ७६
न चढवे, बसली मग खालतीं.
वदन तों पुसतां, हळु बोलती.

"चढण ही कसली ! दमलें, गडे !
मरण हें दिसतें. कसले कडे ! ७७
खाऊं जरासा दम. काय घाई ?
हा शत्रु आहे यम खास बाई.
ही वाट आतां उरली किती कीं !
आहे किती डोंगर ! काय बाकी?" ७८
पाही बहिर्जी मग वाट सारी.
"थोडी" ह्मणे. "डोंगर ही कटारी.
चला जराशी." मग वाट झाली.
तों सुज्ञ राणी उठली, निघाली. ७९
शिवाजी तिचा झोंक अंगीं धरी कीं;
तसा तोल त्याच्या वरी स्त्री हि टाकी.
अर्धी हात तो एक कंब्रेस घाली;
दुजा हात त्याचा तिची मान झेली. ८०
जिथें लागती ठेंच; घेतो कडेला.
पुढें घालतो शूर वारा सखीला.
जरा स्वस्थ होतां, पुढें राय चाले.
असे चालतां चालतां कष्ट झाले. ८१
शेंड्यास जातां वन फार फांके.
तों रात्र खाशी निवळे, चकाके.
तारागणांनीं झळके अभाळ.
लागे पुढें रुंद सपाट माळ. ८२
तिघे फार एथें मनीं स्वस्थ झाले.
मधें सूक्ष्म राणी; पुढें राय चाले.

बहिर्जी महाशूर मागून येतो.
कसें सौख्य वाटेंत होई; पहातो. ८३
मऊ वाट. रेती पडे कीं सभोंती.
हसे शूर राजा. सखी शांत होती,
करी हास्य चर्या; खुल फार राणी;
बहिर्जी जसा रंग गोष्टींत आणी. ८४
गोष्टी बहिर्जी रमणीय सांगे,
चाले जसा वीर वनांत संगें.
गोष्टींत चातुर्य, विचित्र रंग.
तो शूर राजा हसण्यांत दंग. ८५
केव्हां सरे वाट, कळे कुणाला ?
ती वाट नामी सुखवी मनाला.
लागे पुढें डोंगर. वाट खालीं.
तों ढीग माजे, उतरंड झाली. ८६
बहिर्जी ह्मणे. "वाट ही नीट आहे.
वनीं ह्या पहा ! त्रास कोठें न राहे.
तळीं चालतांना जरा दुःख काढा.
पहा ! ताप येतां असे योग्य काढा." ८
उतरतां फिरतां दमली सखी.
भद्दर ती तुडवो वन सारखी.
हसत गोड सखी ह्मणती पुढें—
" बहु वनीं असती उलटे तिढे. ८८.
कडा उंच गेला. कडा खोल आला.

सरें एक तंटा. दुजा भाग झाला.
पुरे त्रास होणार, केव्हां कळेना.
भला आज पाहा ! तरी चालवेना." ८९
मोठा कडा हा उतरून गेले.
वाटेंत ह्या त्रास उदंड झाले.
राणी बसे, तों बसतो हि वीर;
त्या गोड स्त्रीला उठवी हुशार. ९०
बहिर्जी ह्मणे-"हो ! शिरा ओहळांत.
असे वाट ही ठीक. चाला निवांत.
निघे ओहळांतून ही वाट आतां.
दुजा मार्ग नाहीं. नसे त्रास जातां." ९१
झुळ झुळा जळ हें पळतें पुढें.
बहुत झाड जमे. पडती तिढे .
निबिड मंडप कीं बनला असे.
सकळ सुंदरसें वन हें दिसे. ९२
पाण्यांत चाले मग गोड कांता;
पायांस वाटे सुख फार आतां;
तों तोंड पाण्यांत धुतां खुशाले.
ती सूक्ष्म राणी हि मजेंत चाले. ९३
तें स्वच्छ पाणी. भरती घुळा ती;
तें सोडती खोंचण, शांत होती.
राजा ह्मणे- " गे ! सरली न वाट.
आतां पुढें चाल समोर नीट. " ९४
नाजूक बोले, चिडतां मनांत.

" जाणार ते, जा. बसतें वनांत.
मी त्रासलें, चाल मला न होती.
हा मार्ग खोटा, वन हें सभोंती." ९५
हसे, शूर राजा ह्मणे-"मौज झाली.
दरी पांडवांची पहा! हीच आली-
करूं आज वस्ती; निजूं सर्व रात्रीं.
अगे! त्रासशी व्यर्थ. झालीच खात्री." ९६
मोठी गुहा पोंखरली विचित्र.
साधू जनांला स्थळ हें सुपात्र.
कट्टा पुढें रुंद सपाट आहे.
त्याच्या पुढें सुंदर चौक राहे. ९७
बाजूस कोनांत झरा उमाळे.
पाणी दिसे निर्मळ, स्वच्छ, काळें.
मध्यें पुढें सुंदर कुंड झालें.
हें पांडवांनीं ह्मणतात केलें. ९८
ह्या पाह्मऱ्यांनीं स्थळ हें लखाके.
पाणी तुडुंबे, लहरींत फांके.
ती थोर, ती भव्य, गुहा झळाळे.
ते खांब नामी, दगडी, निराळे. ९९
नक्शी, तसा डौल, मनास झोंबे.
पाहून पेलू, बहु दृष्टि तुंबे.
कोरींव धोंडे, छपरी अशी ती.
ते शुभ्र, कीं लाल हि रंग होती. १००
भिताड कोरींव; विचित्र शोभा.

पूर्वी वसे सुंदर काय रंभा ?
झाडी सभोंती घन दाट फांके.
माथा गुहेचा झुडुपांत झांके. १०१
त्यांच्या फांद्या डोलती, लोंबती कीं,
वारा येतां शब्द होती. विलोकीं.
माजे शोभा. वास घाले वनांत.
राजा आला. स्वच्छ जागा गुहेंत. २
हरपली, बसली सुकुमार ती.
सरळ केश सखी वर सारती.
हसत शोभत ती ह्मणती " सख्या!
घर वनीं असलें तुज सारख्या. ३
माझे अहाहा ! श्रम सर्व गेले.
हें स्थान पाहून मनीं निवालें.
योद्धया महा शूर ! तुझ्या प्रसंगें.
हें सौख्य पाहीं; नवलांत गुंगें. ४
चातुर्य हे वीर ! तुझें कळेना.
तूं देव रे ! हें मज आकळेना.
जेव्हां मला त्रास वनांत झाला;
तेव्हां मला राग उगीच आला. ५
महाल ऐसा न मिळे नृपाला,
आश्चर्य हें कीं सहजाच आला.
ही योग्यता थोर तुझी. प्रिया रे !
मी बोललें व्द्वाड उगीच सारें. ६
रे ! जन्म घ्यावा सुख हें मिळाया.

मोठीं तपें घोर करून. राया !
तों शूर हा भाग्र मलाच झाला.
हा वांटणीला मग वीर आला." ७
तो रंगला, शूर पुढें ह्मणाला—
"येये बहिर्जी, बस. त्रास झाला."
पाणी बहिर्जी मग शुद्ध काढी.
पक्कान्न तो शूर नृपास वाढी. ८
खाऊन राजा बहु तृप्त झाला.
राणीस संतोष विचित्र केला.
तो शूर राजा ह्मणतो"—बहिर्जी,
पक्कान्न रे भाकर आण ताजी. ९
बिछाना मऊ छान केला निजाया.
ह्मणे सुज्ञ राजा "प्रिया ! या निजा या."
पुढें घोंगडें राय टाकी स्वताला.
हसे तो बहिर्जी, असा रंग झाला. ११०
तों सुज्ञ राणी ह्मणती नृपाला—
"आला असे कीं छळ हा कपाळा.
भावा विना देव मिळे कुणाला ?
हें स्वच्छ आतां कळलें मनाला. ११
पुरे ही परीक्षा. मला ज्ञान आलें.
तुझें थोर सामर्थ्य पक्कें कळालें.
मला भ्रांति झाली. दयाळू तरी तूं
तुझ्या ह्या कृतीचा उरे काय किंतु ?" १२
द्रवे राय, तों तो मिठी त्यास घाली.

भरे कंठ बाष्पें, रडाया निघाली.
तिला सुज्ञ राजा म्हणे-"हे सखे गे !
तुझ्या वीण हें सौख्य कां गोड लागे! १३
तुझा देह गे । हा . तुझा प्राण गे । हा.
तुझ्या वीण मी राज शोभें. अहाहा !"
असें बोलतां रंगली सौख्यखाणी.
निजे शूर राजा. निजे सुज्ञ राणी. १४
काढी बहिर्जी मग अल्गुजाला,
नामी हणी तान करी मजाला.
तो सूर, आलाप मनास झोंबे.
तों चित्त आनंदभरें तुडुंबे. १५
तों कंप दावी, चढवी स्वराला,
मारी लकेरी, मिळतो सुराला.
डोले महाराज; मनीं खुशाले.
" शाबास मित्रा " मग राय बोले. १६
बहिर्जी पुढें रान हिंडे सभोंती.
कशी वाट आहे; कुठें काय जाती.
नसा काय कोल्हा, असा हिंडला कीं
कुठें लागती गांव; सारें विलोकी. १७
बाजूस त्या म्लेंच्छ कुणी दिसेना.
ते देशपांडे पिळतात सेना.
आहे मराठी लवणांत फौज.
तों देशपांडे करतात मौज. १८
असा रंग, ही संधि, पाही बहिर्जी.

मराठे पहातां मनीं फार राजी.
पुढें सोबती सर्व त्याला मिळाले.
“कसा काय राजा ?” असें ते ह्मणाले. १९
ते गोष्ट ऐकून मनीं निवाले.
योद्धा बहिर्जी मग काय बोले ?
“राजा शिवाजी बहु सुज्ञ आहे.
नाहीं पहा त्रास, न कोप राहे. १२०
जसी वेळ येती; तसा सुज्ञ रंगे.
नको सौख्य त्याला; नको राज्यदंगे.
नको कीर्ति त्याला; दया फार आहे.
मराठ्या जनांचा सदा घोर वाहे.” २१
होतें तिथें एक गरीब घोडें.
घेतो बहिर्जी, मग पार दौडे.
तें सैन्य कोठें पसरून गेलें.
रानीं तसें सर्वच शांत झालें. २२
फुटे छान गोंडा. पहा ! रात्र गेली.
उठे सुज्ञ राणी; मनीं दंग झाली.
नसे शूर राजा. नसे तो बहिर्जी.
वनीं एकटी ती; मना त्रास भाजी. २३
हिंडून रानीं मग राय आला.
घोडें बहिर्जी दवडी; निघाला.
तों भेट होतांच, गुहेस येती.
तों सुज्ञ राणी मग शांत होती. २४
निघाले तिघे. वाट आली समोर .

खुले सृष्टिचर्या. उठे रंग फार.
उठे शब्द रानीं. उडे सर्व पक्षी.
जिथें फार चारा, तिथें मार्ग लक्षी. २५
दिसे बिंब तें लाल, गाढें, विशाळ.
गुलाबी उठे, शोभतो फार माळ.
मुलामा जणों, माखलें काय सोनें!
तसीं रंगलीं डोंगरीं उंच रानें. २६
झाडा वरी तेज पडे, तरंगे.
तों पालवी कोमल गोड रंगे.
आकाश शोभे, झिलई चढे ती.
पृथ्वी झळाळे चमकून रेती. २७
कोल्हे, ससे, सर्व वनीं निघाले.
जागें सकाळीं वन सर्व झालें.
रानामधें तों हरणें उडालीं.
तेव्हां वनीं काळविटें हि आलीं.२८
झाडांत आला बहिरी ससाणा.
तेव्हांच गाजे वन हें दणाणा.
पक्षी उडाले; किलबील झाली.
चाले पुढें वाट वनांत खालीं. २९
सुटे मंद वारा, सुखाचा सुकाळ.
असा रंग सारा. मजेची सकाळ.
स्वतां शूर राजा पुढें वाट न्ह्याळी.
निघे सूक्ष्म राणीहि; हातांत ढाळी. १३०
घोड्यावरी ती बसली सखी तों.

मागें बहिर्जी पळतो, निघे तो.
कोठें महाशूर पुढून चाले;
कोठें सर्वें धांवत गोड बोले. १३१
असा चालतां चालतां काळ गेला.
सहा कोश तो मार्ग तेव्हांच झाला.
चढे सूर्य, तों ऊन झोंबे जरा कीं.
तसी सूक्ष्में राणी सभोंती विलोकी. ३२
ह्मणाला बहिर्जी -"नदी दूर नाहीं.
विसावा मिळे, तों धरा धीर कांहीं.
पहा रास, लेंड्या किती ह्या पहा हें.
इथें भेंकरें हिंडती. खास आहे. ३३
पहा काय ताज्या ! " ह्मणे; हात लावी.
"कशी भेंकरांची तऱ्हा ही! पहावी."
पुढें गोष्ट सांगी. मजा फार झाली.
असी बोलतां बोलतां वाट गेली. ३४
बहिर्जी ह्मणे -"हिंडलों मी वनांत.
उठे काय वार्ता मराठ्या जनांत.
कुणी शूर बोले- 'पडे खान तेव्हां.
पळाला शिवाजी-कळे त्यास जेव्हां. ३५
बोले पहा ! खान विचारशीळ.
गेला शिवाजी. फुटलें कपाळ.
तो बादशाहा कपटी मनांत.
योद्धा शिवाजी पळतो वनांत. ३६
करूं काय आतां ? नको शौर्य आतां.

नको फौज आतां-नको युद्धवार्ता.
पुढें फाजिला माजला शूर झाला.
ह्मणे-"खान साहेब ! योद्धा पळाला. ३७
मराठा शिवाजी रणीं आज भ्याला.
असा रंग पाहून तो पार गेला.
रणीं युद्ध होतां मिळे शत्रु हातीं.
असे वीर हा मी- ' नको आज भ्रांति - ३८
पायां पडे खान ह्मणे- ' नको रे !
झालें पहा हें रण आज कोरें.
आहे जणों ही पहिली लढाई.
योद्धे मराठे करतील घाई. ३९
नसे त्रास त्यांना-नसे दुःख त्यांना.
नसे मोड त्यांचा; असो शत्रु नाना.
असे धीर भारी. असे शौर्य भारी.
रणीं युद्ध त्यांच्या सवें कोण मारी ? ४०
जातों घरीं मी. रण तूंच मार
आहेस योद्धा रणशूर वीर.'
बोले असें खान; निघे घराला.
तो फाजिलाला मग त्वेष आला. ४१
बोले मनीं शूर- 'कळेल आतां.
मी शूर कैसा, रणरंग होतां.
मारीन योद्धे सगळे मराठे.
योद्धा शिवाजीच टिकेल कोठें ? ४२
रणीं कैद होतां शिवाजी पहा कीं.

पुढें बादशाहास दावीन लोकीं.'
असें बोलतां फौज सारी निघाली.
सर्वे फाजिला शूर. गर्दी उडाली. ४३
ते देशपांडे धरतात रोंक.
गांठून रात्रीं हणतात ठोक.
"हें सर्व राजा। कळलें मला कीं.
गेली पहा वाट. नदी विलोकीं." ४४
पाहून तें पात्र खुले शिवाजी;
ऐके जसी गोष्ट मनांत राजी;
पाही नदी शूर, हसे जरासा.
तों दाट झाडी, बहु रंग खासा. ४५
तों मोर नाचे. मग डौल दावी.
तीं पांखरें दाट. मजा पहावी.
ते वृक्ष मोठे लवती जळांत.
पाण्यांत फांद्या भिजती अनंत. ४६
दिसे पात्र कांहीं. पुढें थांग नाहीं.
पुढें स्वच्छ काळी नदी शूर पाही.
नदीतीर आला. सखी शांत झाली.
झरारां पुढें सूक्ष्म राणी निघाली. ४७
वाळू दुतर्फा पसरून राहे.
मध्यें नदी सोज्वळ, मंद वाहे.
ती शेरणी, रंग सुरेख साजे.
होती पिपाणी. मृदु पात वाजे. ४८
तो मोळ कांठीं हिरवा विराजे.

ती गाढ छाया, वन फार माजे.
एथें घुसे मूळ जळीं वडाचें.
त्याच्या वरी तेज विचित्र नाचे. ४९
पुढें स्वच्छ पाणी. असे शांत रानीं.
उभा बाजुला तो बहिर्जी इमानी.
पडे सावली. ती उभी सूक्ष्म राणी.
महाराज सारा मनीं रंग आणी. १५०
दिसे गोड राणी. जरा लाल डोळे !
मुखीं घाम आला. किती बिंदु ढाळे !
कपाळीं झळाळी सुशोभा विराजे.
शिरा दोन मध्यें उभ्या. मूर्ति साजे. ५१
तो स्नेह डोळयांत. मनीं खुशाले.
ती कांति भारी भुवयांत डोले.
तें नाक. शेंडा हलतो जरासा.
तो रंग त्याचा सुकुमार खासा. ५२
ताजी सकाळीं सुटती हवा कीं;
गालीं उठे ती सुरखी लखाखी.
चोळी खुले. सुंदर झोक आतां.
तो घाम, तो भांग, सुरेख कांता. ५३
अशी देखतां, शूर राजा ह्मणाला—
" फिटे पारणें. नेत्र माझा निवाला.
सखे साजणे गे ! चढे काय शोभा !
तुझ्या, गे पुढें खास लाजेल रंभा. ५४
आतां सखे ! तं मज घास दे. गे !

ही वृक्षछाया. सुख फार लागे.
राणी तसी ती ह्मणती नृपाला—
“संतोष माझ्या करतां मनाला. ५४
तुह्मी शूर आहां. तुह्मी देव. राया !
असा लाड माझा निघाला कराया.
पडे तेज हें, तों खुले तेज माझें.
तुह्मावीण कीं सौख्य सर्वत्र वांझें. ५५
काठीं जिथें सुंदर पात्र वाहे.
गेली तिथें. मौज बघीत राहे.
ती अन्न टाकी. जमतात माशे.
ते नाचतांना करती तमाशे. ५६
खंड्यापक्षी लावतो रोंक फार;
पाण्यावर्ती नाचतो तो हुशार.
धांवे खालीं, काळ कांहीं न लागे;
मारी मासा, त्यास खाण्यांत रंगे. ५७
प्याली पुढें सोज्वळ स्वच्छ पाणी;
झाली निघाया मग सिद्ध राणी.
लागे पुढें तों वन. वाट गेली.
झाले दहा कोश. दुपार झाली. ५८

रणरणे वन. डोंगर तापले.
भर दुपार. सुतार घुमे; खळे.
कहर तो. न झुडूप, न सावली.

कढत माळ. जमीन पिसाळली. ५९
काटे कुळ्या, औंगळ झाड होतें.
थोटें अरासें, सडकें दिसे तें.
गोटे सभोंती, वन फार खोटें.
मनुष्य कोणी सहसा न भेटे. १६०
वाळू. दिसे पात्र. नदीहि नाहीं.
बारी पुढें घोर. न वाट कांहीं,
एथें उभे दोन जवान काळे.
ती एक त्यांची टक. घोर डोळे. ६१
हातांत सोटे धरती समोर.
लोखंड त्याना पिळलें कठोर.
आले तिघे. झाड अरण्य लागे.
राणी बघी रान, भयांत गुंगे. ६२

ह्मणे शूर राजा. "बहिर्जी पहां हां!
उभे चोर ते दोन मोठे अहाहा.
बहिर्जी पहां माण घेणार दुष्ट.
कुणी मांग आहेत, हें खास स्पष्ट. ६३
कसे कायबा? घोर आला प्रसंग.
चला! देह राहो, पडो. घाल लांग."

असे बोलतां ती ह्मणे सूक्ष्म राणी—
" सख्यारे नको युद्ध. " डोळ्यांत पाणी.६४
सुटे कांप अंगा. सुटे घाम भारी.

उभी, स्तब्ध झाली पुढें सुक्ष्म नारी.

बहिर्जी सरारे पुढं; दंड ठोकी;
उडे; शूर अंगावरी धूळ फेंकी. ६५
तसे दुष्ट ते चोर आले समोर.
ह्मणूं लागती, काढती शब्द घोर.
" तुह्मी कोणरे ? माल टाका भसासां.
पहा सोट हारे ! हणूं काय ठोसा !" ६६
तों सूक्ष्म राणी पडलीच खालीं.
ते चोर. तें रान. मनांत भ्याली.
तों काव्हला कीं रण शूर राजा.
ज्याला चढे जोर वनांत ताजा. ६७
सोडून राणी वळले निराळे.
तों चोर आले फिरवीत डोळे.
भ्याला जसा कीं पळतो बहिर्जी.
तेव्हां जरासा लवतो शिवाजी. ६८
बहिर्जीस जों चोर आला हणाया,
धरी हात तों शूर दाबून पायां;
हणी टांग, पाडी पुढें चोर खालीं;
भरी शूर स्वारी, जमीनींत थोळी, ६९
पिढे फार, तेव्हां हणी त्यास ठोसा;
पुढें चोर तो रक्त ओकी भसासा.
दुजा चोर तो धांव धांवून आला.
जसा शूर राजास गांठीत गेला; १७०

तसा शूर तो अंतराळीं उडाला;
धरी मान; तेव्हां दिला एक टोला;
गरारा फिरे चोर; बेशुद्ध झाला.
धरी वीर पायास, फेकी अभाळा. ७१
राजा, बहिर्जी, मग शांत झाले.
राणी पुढें धांवत शूर आले.

तों सुज्ञ राणी ह्मणती नृपाळा—
" मेला पहा चोर. अरे कपाळा ! ७२
हें शौर्य, चातुर्य. उगीच भ्यालें.
नाहीं स्त्रियांना दम. काम झालें."

तों चोर पायां पडती नृपाच्या.
तो शूर बोले मग गोड वाचा. ७३
" तुह्मी कोण आहां ! कसे चोर झाला !
तसे बोलती चोर. " आलें कपाळा.
अशी चाकरीही. मिळे रोजमारा.
धनी नूरजानी. पहा शूर वीरा " ७४

चोरास बोले मग शूर राजा—
" झाला तुह्मा दंड. पुरे. चला जा.
म्लेंछीण हें कर्म करी. अहाहा !
रे ! दोष नाहीं तुमचा खरा हा." ७५
तसें चोर जातां, बहिर्जी ह्मणाला—

"दिले माप. राजा ! चमत्कार केला.
तरी चोर घ्यावे सर्व आज. वाटे.
पहा फार कामास येतील वाटे." ७६

बहिर्जी पुढें हाक मारी; ह्मणाला—
अरे! कां निघाला? करा चाकरीला.
कशी चाकरी? बोल, येती कराया.
किती कोश रानांत येतें फिराया? ७७

किती रांगणा, बोलरे! दूर आहे!
कशी वाट जाती? कुठे कोण राहे?

तसे बोलती चोर— "हा रांगणा हा.
पुढें दोन हे कोश आहेत. पाहा." ७८

निघाले. दुजी वाट रानांत लागे.
वनीं चालले ते. जसा मांग सांगे.
चढे शूर तो रांगणा, दूर पाही.
दिसे मौज भारी. मनीं त्रास नाहीं. ७९

मग सखी रमतां ह्मणती मनीं—
"विरळ सौख्य असें मिळतें जनीं.
मधुर, शूर, भला, मजला धनी.
बहु अयोग्यच मी मग कामिनी." १८०

किल्ल्या वरी ह्या मग माय भेटे.
आनंद चित्तीं तिज फार वाटे.
बोले- "मुला तूं सुखरूप कां रे?